म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का० १०
दा. क्र. १३२५५

IRBK-0113258
IRBK-0113258

[redacted]




म. ग्रं. सं. ठाणें
विषय बालवाङ्मय
क्र. ३६७०

वा. ल. पाठक
ग्रंथप्रकाशक - ग्रंथविक्रेते
मोतीबाजार, मुंबई क्र. २

मुद्रक

द. वि. पाठक,
जगदीश्वर प्रिंटिंग प्रेस,
गिरगांव, गायवाडी,
मुंबई ४

•

प्रकाशक

द. वि. पाठक,
बा. ल. पाठक प्रकाशन,
मिर्झास्ट्रीट, मोतीबाजार,
मुंबई २

•

प्रथमावृत्ति

फेब्रुवारी १९७०

•

मुखपृष्ठ व रेखाचित्रें :

श्री. डी. के. देसाई आर्टिस्ट
स्टुडिओ आर्ट कॉर्नर
मुंबई ४

•

सर्व हक्क प्रकाशकाधिन

# हंसा

फार फार जुनी गोष्ट आहे ही. एका राज्यांत एक मजूर रहात होता. खूप गरीब होता तो. एकटाच होता बिचारा. त्याला स्वतःची जमीन नव्हती कीं शेत नव्हतं. आईवडील आणि भाऊबहिणीही नव्हत्या. तो दिवसभर लोकांच्या शेतावर काम करायचा. काम नाहींच मिळालं तर रानांत शिकार करायचा किंवा तळ्यांतले मासे पकडायचा आणि आपलं पोट भरायचा. एक दिवस असाच तो शिकारीसाठी रानांत गेला. बराच वेळ हिंडूनही त्याला शिकार मिळाली नाहीं. संध्याकाळ व्हायला आली. तेव्हां त्यानें विचार केला कीं आतां तळ्यावर जावं. दिवसभर तहानलेलीं जनावरं तिथं पाणी प्यायला येतील. पक्षी येतील, निदान काही मासे तरी मिळतील. असा विचार करून तो तळ्यावर गेला. पण त्या दिवशीं काय झालं होतं कोण जाणे, एकही प्राणी पाणी प्यायला तळ्याकडे वळला नाहीं कीं त्याच्या गळाला एक मासाही लागला नाहीं. तो मजूर–राणू त्याचं नांव– बराच वेळ वाट पाहून अगदीं निराश झाला. सूर्य अगदीं मावळायची वेळ झाली होती. अजून फक्त अर्धा तास थांबायचं असं राणूनं ठरवलं आणि तो वाट बघूं लागला. अशीं पांच दहा मिनिटं गेलीं असतील नसतील, तोच त्याला आकाशांत पंखांची फडफड ऐकूं आली आणि तो सावध होऊन एका झुडुपाच्या आड जाऊन पाहूं लागला. पाहतो तो–खरंच पश्चिमेकडून तीन मोठे हंसपक्षी वेगानें उडत तळ्याकडे येत होते. आणि आश्चर्य

म्हणजे या हंसांचे पंख झगझगीत सोनेरी होते आणि त्यांच्या चोची, डोळे आणि पाय माणकासारखे लालभडक होते.

राणू आश्चर्यानें थक्क होऊन पहात होता. संधि साधून यांपैकीं एखादा हंस पकडण्याचा त्यानें निश्चय केला होता आणि म्हणून तो हंसांवर एकटक नजर ठेवून होता. पाहतां पाहतां एक विलक्षण गोष्ट घडली. तिन्ही हंस तळयाच्या कांठावर उभे राहिले आणि एकाएकी त्यांचें तीन अतिशय सुंदर अशा तरुणींत रुपांतर झालें. त्यांनीं आपल्या अंगावरील सोनेरी पिसें आणि पंख बाजूला काढून ठेवले आणि त्या स्नानासाठीं पाण्यांत उतरल्या.

राणूचा आपल्या डोळयांवर विश्वास बसेना. पण लवकरच तो भानावर आला. तो बसला होता त्या झुडुपाच्या जवळच त्या तरुणींपैकी एकीनें पंख आणि पिसें ठेवलीं होतीं. राणूच्या मनांत एक कल्पना आली. त्यानें हात लांब करून ते पंख आणि पिसं उचलून घेतलीं आणि पुनः तो झुडुपांत दडून राहिला.

स्नान करून बाहेर आल्यावर तिघी तरुणी आपले पंख आणि पिसें घ्यायला निघाल्या पण एकीला तीं सांपडेनात. ती सर्व ठिकाणीं शोधूं लागली. तिच्या बहिणीनीही तिच्यासाठीं खूप शोधलें. पण व्यर्थ. पंख आणि पिसें मिळेनात. असा बराच वेळ गेला आणि पश्चिमेकडून कुठल्यातरी अनोळखी पक्ष्याची लांबलचक शीळ ऐकू आली. त्या तरूणीपैकीं दोघीनी तिसरीकडे निराश होऊन पाहिलें आणि पहातां पहातां त्यांचें पुनः हंसांत रूपान्तर झालें. हंस घाईघाईनें पश्चिमेकडे उडून गेले.

तिसरी तरूणी अतिशय दुःखी झाली. ती हुंदके देऊन रडूं लागली. पुनः पुनः शोधूं लागली आणि म्हणूं लागली. " ज्याला

कुणाला माझे पंख आणि पिसं मिळाली असतील त्यांनीं ती कृपा करून मला द्या. मीं त्याला धन, कीर्ति, ऐश्वर्य मान-मरातब काय हवं तें मिळवून देईन पण माझ्या वस्तू मला परत मिळाव्यात."



मग मात्र राणूला तिची दया आली तो झुडुपांतून बाहेर येऊन म्हणाला, "हंसा, हंसा, रडूं नको, मी तुझे पंख आणि पिसं परत देतो."

हंसा रडायची थांबली. राणूकडे आनंदानें पहात ती म्हणाली, "खरंच देशील? मी तुला हवं तें देईन. दे माझे पंख नि पिसं."

"हीं घे. पण मी मागतो तें खरंच देणार आहेस?" राणूनें विचारलं. "हो, अगदीं नक्की"

"माझ्याबरोबर येशील? माझ्याशीं लग्न करशील? मला दुसरं कोणी नाहीं. मी गरीब आहे पण तुला सुखांत ठेवीन.

आपण माझ्या झोपडींत आनंदानें राहूं. बोल. आहे कबूल ? हंसानें राणूकडे टक लावून पाहिलं. तिला हा साधाभोळा दिसणारा पण चतुर कष्टाळु आणि हंसतमुख तरूण आवडला. ती हळूच म्हणाली, " हो येतें मी तुझ्याबरोबर. "

राणू मनापासून आनंदला. तिला घेऊन घरीं आला. हंसाशीं त्यानं लग्न केलं आणि आपल्या झोपडींत तो सुखानं राहूं लागला.

कांहीं दिवस गेले. हंसा घरांतलं सगळं काम करीत होती. राणूबरोबर शेतावर कामासाठीं जात होती. तिला सर्वांनीं पाहिलं आणि ज्यांनीं ज्यांनीं पाहिलं ते ते तिच्या सौंदर्यानें दिपून गेले. रात्रंदिवस तिचीच प्रशंसा करूं लागले. त्यांना बोलायला दुसरा विषय सांपडेना. हळूहळू हंसाच्या सौंदर्याची कीर्ति राजाच्या कानावर गेली. त्याला हंसाला पाहण्याची इतकी उत्सुकता निर्माण झाली की राज्याची पहाणी करण्याच्या निमित्तानं तो स्वतः हंसाच्या गांवांत आला आणि हंसाला त्यानं डोळे भरून पाहून घेतलं. त्याच्यावरही तिच्या रूपाची इतकी मोहिनी पडली कीं रात्रंदिवस त्यानं तिचा ध्यास घेतला. एका साध्या मजुराची बायको इतकी सुंदर असावी हें त्याला खपेना. त्याला वाटलं यापेक्षां आपली राणी म्हणून राजवाड्यांत ती किती शोभून दिसेल! पण ती मिळणार कशी ? पळवून आणावी तर लपवून ठेवावी लागेल. पण अशी लपवून तरी किती दिवस ठेवणार ? लोकांना कळेलच. त्यांचा राजावरचा विश्वास उडेल. राणूला ठार मारलं किंवा कांहीतरी सबब काढून तुरुंगांत टाकलं आणि त्याची बायको पळवली तरी लोक संतापतील, बंड करतील, कारण राणू फार सज्जन आणि कामसू

माणूस आहे. गांवाचा आवडता आहे. बरं राज्यांतून हद्दपार केला तर ? पण पुनः तेंच लोक चिडतील. राणूचीच बाजू घेतील. तो लपून छपून राज्यांत परत येईल आणि सारे त्यालाच मदत करतील. मग काय करावं बरं ? विचार करकरून राजाचा मेंदू शिणून गेला. त्याला या विचारानं झोंप येईना. हंसाची प्राप्ति कशी करून घ्यावी या एकाच विचारानं त्याला झपाटून टाकलं.

बरेच दिवस विचार केल्यावर राजाला एक युक्ति सुचली. त्यानें एका विश्वासू नोकराला राणूकडे पाठवलं. नोकर राणूकडे येऊन काळजीच्या स्वरांत म्हणाला, " राणू, महाराज फार आजारी झाले आहेत. कुठल्याच औषधाचा गुण येत नाहीं. वैद्यराज म्हणतात, काळया वाघिणीचं दूध जर मिळालं तरच त्यांचे प्राण वांचण्याची आशा आहे. पण काळे वाघ फार क्रूर असतात म्हणून कुणी हें काम अंगावर घ्यायला धजावत नाहीं. ते सांपडतील असं रानही फार दूर आहे. रस्ता खडतर आहे. महाराज म्हणतात, राणूलाच हें काम जमेल. राज्यांत त्याच्या-इतका शूर आणि हुषार शिकारी दुसरा नाहीं. बघ तूं मनावर घेतलंस तरच महाराजांचे प्राण वांचतील. करशील का एवढं काम ?

राणू बिचारा साधासुधा स्वामिनिष्ठ मजूर. राजा आजारी आहे हे कळल्यावर त्याला त्याची काळजी वाटलीच पण त्यानं मुद्दाम आपल्याला काम सांगितलंय हे कळल्यावर अभिमानही वाटला. त्यानं ताबडतोब हे काम कबूल केलं आणि तो प्रवासाच्या तयारीला लागला. राजाचा नोकर खूष होऊन परतला आणि त्यानं राजाला झालेली हकीकत सांगितली. राजा आनंदित झाला. त्यानं नोकराला चांगले बक्षिस

दिले. व म्हणाला, " आता कसला परत येतोय तो. ते अरण्यच येवढं भयंकर आहे की, तिथल्या वाघ सिंहाच्या, विषारी सापांच्या आणि माजलेल्या हत्तींच्या तावडीतून तो सुटणं शक्यच नाहीं. आणि सुटलाच तरी काळया वाघाना असते माणसाच्या रक्ताची चटक, वाघिणीचं दूध काढायला तो जिवंतच रहाणार नाहीं. आपण पंधरा दिवस वाट पाहूं. मग त्याच्या बायकोला इथंच आणूं. "

राणू प्रवासाला निघाला. त्यानं हंसाला सगळी हकीकत सांगून तिचा निरोप घेतला. हंसा शहाणी होती. तिनं ओळखलं की राणूला या कठीण कामावर पाठवण्यामागे राजाचा कांहींतरी दुष्ट हेतू आहे. तिनं राणूला अडवलं नाहीं पण त्याला एक लाल मण्यांची माळ दिली आणि सांगितलं, " ही माळ नेहमीं जवळ ठेवा. कुठल्याही प्राण संकटांत ती तुमचं रक्षण करील. ती वाघीण तुमच्यावर हल्ला करायला आली तर ही माळ तिच्या-पुढं टाका. ती शांत होईल. "

राणूनं माळ घेतली आणि तो निघाला.

सतत सात दिवस डोंगर आणि दऱ्या ओलांडून नद्यानाले पार करून रस्ते आणि सडका तुडवून राणू एकदाचा त्या जंगलापाशीं येऊन पोहोचला. या सात दिवसांत त्यानं धड विश्रांति घेतली नाहीं कीं पोटभर अन्न खाल्लं नाहीं आणि पुरेसं पाणी प्यायला नाहीं. रात्रंदिवस त्याला आपली वाघिणीचं दूध मिळण्याचीच विवंचना लागली होती. अखेर तो त्या घनदाट अरण्यांत शिरला. बरंच चालून गेल्यावर झाडाझुडुपांच्या गर्द जाळीत एक काळोखी गुहा दिसली. राणूनं कसाबसा जाळींतून

गुहेपर्यंत प्रवेश करून घेतला आणि धीर करून गुहेंत डोकावून पाहिलं. सुरुवातीला आतल्या काळोखामुळं त्याला कांहीं दिसेनाच पण मग डोळ्यांना सराव झाल्यावर अंधुक दिसायला लागलं. राणूनं डोळे फाडून पाहिलं आणि तो एकदम प्रसन्न झाला. आंत एक काळी वाघीण आपल्या पिलांना घेऊन पहुडली होती. राणूची चाहूल लागल्याबरोबर ती चटकन उठली आणि एक मोठ्यानं डरकाळी फोडून त्याच्या अंगावर धावली. राणूनं चपळाई केली आणि आठवणीनं हंसानं दिलेली लाल मण्यांची माळ तिच्यापुढं भिरकावली आणि नवल म्हणजे वाघीण एकदम एखाद्या गाईसारखी शांत झाली आणि पुढें येऊन त्याचे हात चाटूं लागली, राणूनं तिच्या अंगावरून भीत भीत हात फिरवला आणि ती खरोखरच कांहीं करीत नाही याची खात्री पटल्यावर तो खालीं बसला आणि बरोबर आणलेल्या भांड्यांत त्यानें दूध काढून घेतलं. तिला थोपटून तिचे आभार मानून तो परत निघाला.

सात दिवस पुनः तसाच खडतर प्रवास करून राणू राजाच्या महालांत पोहोचला. काळ्या वाघिणीचं दूध काढून आणल्याची बातमी त्यानं राजाला पोहोचवली. राजाचा प्रथम विश्वासच बसेना. पण त्यानें राणूला जिवंत पाहिलं आणि दूधही वाघिणीचंच असल्याची खात्री करून घेतली. मग मनांत अतिशय खजील झाला तरी वरवर फारच आनंदित झाल्यासारखं दाखवून त्यानं राणूला बरंच बक्षीस देववलं आणि त्याचं कौतुक केलं, आभार मानले. राणू खूश होऊन घरी गेला. राणूच्या औषधानंच आपण बरे झालों असं राजानं जाहीर केलं आणि हा एक बेत फसल्यावर हंसाला प्राप्त करून घेण्यासाठीं दुसरा कोणता उपाय करतां

येईल याचा तो विचार करूं लागला. बराच विचार करूनही त्याला स्वतःला कांही उपाय सुचेना तेव्हां त्यानं त्याच्या खास सल्लागारांना बोलावून आपलं दुःख त्यांना सांगितलं व उपाय विचारला, पण त्यांनाही बरंच डोकं खाजवल्यानंतरही कांही सुचेना. असा खूपसा वेळ गेल्यावर एक म्हातारा अनुभवी सल्लागार उठला आणि म्हणाला, " एक उपाय करतां येईल महाराज, आपण पुनः आजारी आहांत असं सांगू त्याला. आणि यावेळीं औषध म्हणून जिला रंग नाही, रूप नाहीं व आकार नाही अशी वस्तू आणायला सांगूं त्याला. त्यासाठीं त्याला तीस दिवसांची मुदत देऊं. अशी वस्तू जगांत असणंच शक्य नाही त्यामुळें ठरलेल्या मुदतींत त्याला ती आणणं अशक्यच होईल आणि मग त्याची वाट पाहून मोठं दुःख झालंसं दाखवून आपण त्याच्या बायकोला राजवाड्यांत आश्रयासाठीं आणूं शकूं. अशा रीतीनं तुमचा बेत तुम्हांला साधतां येईल. "

राजाला म्हाताऱ्या सल्लागाराचा सल्ला ताबडतोब पटला. त्यानं लगेच दूत पाठवून त्याप्रमाणें निरोप राणूला पाठवला देखील. राणू खराच भोळा. त्याला वाटलं, राजाचा आजार खराच फार गंभीर असावा. त्याशिवाय का एवढीं दुर्मिळ आणि अतिशय कष्टसाध्य औषधं वैद्यराज त्यांना सुचवीत असतील? दरवेळीं विश्वासू माणूस म्हणून राजाला आपलंच नांव सुचावं याचा त्याला संशय येण्याऐवजी उलट अभिमानच वाटला आणि पुनः राणू अधिक दूरच्या प्रवासाच्या तयारीला लागला. मात्र यावेळीं त्याला कुठें जावं आणि या अशा कुणीही न पाहिलेल्या वस्तूचा कसा शोध घ्यावा हेंच कळेना. दोन-तीन दिवस रात्रभर

जागून त्यानं कर कर विचार केला. त्याची बेचैनी हंसाच्या लक्षांत आली तिनं त्याबद्दल राणूला विचारलं आणि राणूनं राजाच्या आजाराची सगळी हकिकत सांगितली.

हंसा गंभीर झाली. राजाचा कावा तिच्या लक्षांत आला. तिनं थोडा वेळ विचार केला आणि ती राणूला म्हणाली, अशी वस्तू कुठं मिळेल तें मला माहित नाहीं कीं तुम्हांला माहित नाहीं. या राज्यांतही कुणाला तें माहीत नसेल. पण राजाची आज्ञा आहे तेव्हां तुम्हांला जावं लागेलच. तुम्हीं असं करा. मी तुम्हांला एक लोकरीचा गुंडा देतें. त्याचं एक टोक तुम्हीं हातांत ठेवा आणि गुंडा खालीं सोडा. तो उलगडत जाईल. त्याच्या मागून जा. तो तुम्हांला वाट दाखवील. मी तुम्हांला आणखी एक पेला देते. त्यांतूनच तुम्हीं पाणी पित जा. तोही तुम्हांला मदत करील" असं म्हणून हंसानं राणूला एक लाल लोकरीचा गुंडा आणि एक सोन्याचा पेला आणून दिला. या पेल्यावर हंस कोरले होते आणि त्यांचे डोळे, चोची आणि पायांच्या जागीं लालभडक माणकं बसवली होतीं. त्या दोन वस्तू घेऊन राणूनं हंसाचा निरोप घेतला आणि तो प्रवासाला निघाला.

गांवाबाहेर आल्यावर गुंड्याचं एक टोक हातांत घेऊन राणूनं गुंडा रस्त्यांत टाकला. जमिनीवर पडल्यावर गुंड्याला जणु पाय फुटले आणि तो सरसर उलगडत जाऊं लागला. राणू त्याच्या पाठोपाठ निघाला. गुंड्याचा पाठलाग करतांना त्यानं दिवस पाहिला नाहीं की रात्र पाहिली नाहीं, तहानभुकेचा विचार केला नाहीं कीं विश्रांति घेतली नाहीं. सारखा तो आपला चालतच होता. अखेर बऱ्याच कांट्याकुट्यांतून, डोंगर-दऱ्यांतून नदी

नाल्यांतून पार पडल्यावर गुंडा एका दाट जंगलांत शिरला आणि तिथल्या गर्द झाडीमध्यें असलेल्या एका छोट्याशा झोपडीसमोर येऊन दारांतून आंत शिरला आणि दिसेनासा झाला.

आतां राणूला थोडा विचार पडला. आंत जावं कीं न जावं ? पुनः हिय्या करून त्यानं दार ठोठावलं. दार लोटलेचं होतं. तें उघडलं. आंत हंसासारखीच दिसणारी तिच्यासारखीच लालचुटुक ओठांची, सोनेरी लांबसडक केसांची, गोरीपान सुरेख तरुणी बसलेली होती. राणू तिच्याकडे पहात राहिला. तिनं राणूला विचारलं. " कोण तूं ? कां आलास ? इथं कोणी आणलं तुला ? "

" मी राणू-मजूर. तुम्हीं ज्या तळयांत अंघोळ करतां तें माझं गांव. राजाच्या दुखण्यावर औषध म्हणून रंग, रूप आणि आकार नसलेली वस्तू शोधायला निघालोय. तुम्हीं मदत कराल का ? " राणूनं विचारलं.

ती तरुणी कांहीं बोलली नाहीं. राणू आशेनें तिच्याकडे पहात होता. बऱ्याच वेळानं ती बोलत नाहींसं पाहून तो निराश होऊन म्हणाला, " मला थोडं पाणी तरी द्याल का प्यायला ? "

तरीही ती तरुणी कांही बोलली नाहीं. मात्र पाणी भरलेली छोटीशी सुरई घेऊन आली. राणूनं खिशांतून सोन्याचा पेला काढला आणि तो तिला म्हणाला, यांत ओता तें पाणी. "

ती तरुणी चमकली, पेल्याकडे निरखून पाहूं लागली. तिनं राणूला विचारलं, " हा पेला तुला कुठें मिळाला ? "

तो माझ्या बायकोनं मला दिला आहे. हा रस्ताही तिनेच दाखवला, कां बरं ? " राणूनं विचारलं.

" तर मग तुझी बायको ती माझी अनेक दिवस बेपत्ता

असलेली धाकटी बहीण आहे. तूं मेव्हणा आहेस माझा " ती तरुणी हर्षानं म्हणाली आणि तिनं राणूला उत्तमोत्तम पक्वान्नं आणि पेयं खायलाप्यायला आणून दिलीं. झोपायला चंदनी पलंग आणि परांची गादी दिली. राणूनं रात्रभर झोपून विश्रांति घेतली. सकाळीं तो न्याहारी करून ताजातवाना झाल्यावर ती त्याला म्हणाली, "तुला हवी असलेली वस्तू कुठं मिळेल हें मलाही माहीत नाहीं. पण मी तुला एक रेशमाचा गुंडा देतें त्याचं एक टोक तूं तुझ्या हातांत ठेव आणि गुंडा जमिनीवरून घरंगळू दे, तो तुला माझ्या मोठ्या बहिणीकडे नेईल. ती कदाचित् तुला त्या वस्तूचा ठावठिकाणा सांगू शकेल." असं म्हणून तिनं त्याला लाल रेशमी दोऱ्याचा एक गुंडा दिला. राणू पुनः प्रवासाला निघाला. पुनः रात्रंदिवस घरंगळणाऱ्या दोऱ्यामागें तहानभुकेची पर्वा न करतां चालत राहिला. पुनः डोंगर, दऱ्या, नद्या, नाले पार केल्यावर पहिल्यापेक्षा अधिक गर्द अशा अरण्यांत येऊन पोहोचला. इथं तर झाडी इतकी दाट होती कीं, सूर्याचे किरण जमिनीपर्यंत पोहोचूं शकत नव्हते. सर्वत्र काळोख होता. त्या काळोखांत झाडीच्या मधोमध असलेल्या एका झोपडीच्या दारांतून गुंडा आंत शिरला आणि अदृश्य झाला. यावेळेस राणूनें विचार केला नाहीं. गुंड्याच्या पाठोपाठ तोही दार ढकलून आंत शिरला. त्याच्या अपेक्षेप्रमाणें येथेंही हंसासारखीच दिसणारी सुरेख गोरीपान तरुणी बसलेली होती. त्याला पहातांच तिनें विचारलें, "कोण तूं? येथें कां आलास? कोणी आणलं तुला?"

राणूनें तिला ठरलेली उत्तरें दिली आणि थोडावेळ थांबून प्यायला पाणी मागितलं. तरुणी बोलली नाहीं पण तिनं पाण्याची

सुरई आणली. खिशांतून सोन्याचा पेला काढून राणू म्हणाला, " यांत पाणी ओता. "

तरुणी पेल्याकडे पहात राहिली. तिनं विचारलं, " हा पेला तुला कुठें मिळाला ? " " माझ्या बायकोनं दिला. हा रस्ता तिच्या मोठ्या बहिणीनं दाखवला. " राणू म्हणाला, " तर मग त्या दोघी माझ्या बहिणी. तूं माझा मेव्हणा, ती हर्षानं म्हणाली. तिनं राणूची चांगली बडदास्त ठेवली. उत्तमोत्तम खाणंपिणं आणि विश्रांति घेऊन झाल्यावर दुसऱ्या दिवशी राणूनं तिला आपण कुठल्या कामगिरीवर निघालों आहोंत तें सांगितलं आणि तिची मदत मागितली.

तरुणी थोडा वेळ विचार करून म्हणाली, " तुझ्या प्रश्नाचं उत्तर मलाही माहीत नाहीं पण आपण कुणाला तरी विचारूं. "

असं म्हणून तिनं तिच्याजवळचं एक छोटंसं सोनेरी शिंग फुंकलं. त्यासरशीं रानांतले सारे पशु तिच्या भोवताली गोळा झाले. तिनं पुनः तिचं शिंग दोनवेळां फुंकलं त्याबरोबर आकाशांत साऱ्या पक्ष्यांनी गर्दी केली. तरुणी त्यांना म्हणाली, " माझ्या प्रजाजनांनो, हा माझा मेव्हणा, कुणीही न पाहिलेली आणि रंग, रूप, आकार नसलेली अशी वस्तू शोधायला निघाला आहे. ती कुठें मिळेल हें तुम्हांला सांगतां येईल काय ? "

" छे छे, अशी वस्तू आम्हांला ठाऊक नाहीं. " पशु म्हणाले आणि मागे सरले.

" छे छे, आम्हांलाही ठाऊक नाहीं. " पक्षी म्हणाले आणि उडून गेले.

एक वटवाघूळ तेवढं तिथं उरलं.

" मलाही माहित नाहीं. पण मी सांगतो तिथं त्यानं जावं. नदीपलिकडे एक पायवाट आहे. ती एका डोंगरांत जाते. ती जेथें संपते तिथं त्यानं जावं. त्याला कांहींतरी उपयुक्त वस्तु सांपडेल ती त्याच्या जन्मभर उपयोगी पडेल." आणि तेंही उडून गेलं.


हंसाची बहीण राणूला म्हणाली, " कळलं ना तुला ? आतां तूं वेळ घालवूं नकोस. कारण तुला दिलेल्या मुदतींत तू परत आला नाहींस तर हंसावर संकटं येतील, जा. तुला यश मिळो."

राणू तिचा निरोप घेऊन निघाला. नदी पार करून पायवाटेनें डोंगरात पोहोंचला. पायवाट एका खडकाशीं जाऊन संपली होती. राणू गोंधळला. आतां कुठं जावं या विचारांत पडला. सहज त्यानं समोरच्या खडकाला स्पर्श केला तों काय ? खडक दुभंगला आणि आंत एक सुसज्ज महाल त्याच्या दृष्टीस पडला. राणू आंत शिरला. आंत कुणीच नव्हतं. राणूनं सर्वत्र हिंडून पाहिलं पण छे, तो एकटाच होता. अखेर दमून तो तिथंच एका पलंगावर पडला आणि गाढ झोपी गेला.

राणू जागा झाला तेव्हां त्याला रथाच्या चाकांची खडखड ऐकूं येऊं लागली. तो पटकन उठला आणि पलंगाखालीं दडून बसला. रथाचा आवाज जवळ जवळ आला. मग थांबला आणि दार उघडून रत्नजडित पोशाखांतील एक प्रचंड राक्षस आंत आला. त्याच्या अंगावरील रत्नें आणि कमरेच्या तलवारीचं सोन्याचं म्यान लखलखत होतं. तो आंत येऊन एका आसनावर बसला आणि टाळी वाजवून मोठ्यानं म्हणाला, " हं, चल, चित्रसेना, माझं ताट वाढून आण."

राक्षसाच्या तोंडांतून शब्द बाहेर पडतात न पडतात तोंच

एक रेशमी शुभ्र वस्त्र त्याच्या समोर अंथरलं गेलं व पक्वान्नांचीं ताटंच्या ताटं त्यावर मांडलीं गेलीं.



राक्षसानं पोटभर जेवण केलं. ढेकर दिली आणि तो म्हणाला, " चित्रसेना, चल हें सगळं आवरून ठेव. "

क्षणांत सगळीं ताटं अदृश्य झालीं.

राक्षसानें थोडा वेळ विश्रांति घेतली आणि पुनः तो तलवार घेऊन बाहेर पडला. त्याच्या रथाचा आवाज ऐकूं येत येत नाहींसा झाला.

राणू पलंगाखालून बाहेर आला. त्याला फार भूक लागली होती. त्यानं ठरवलं आपणही राक्षसासारखं करून पहायचं. तो त्या आसनावर बसला आणि टाळी वाजवून म्हणाला, " हं, चल, चित्रसेना, माझं ताट वाढून आण. "

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ७६५३३ ... वि बालवाङ्मय
क्रमांक ३६७० ... नोंद दि ...



पुनः तें शुभ्र वस्त्र अंथरलं गेलं आणि पक्कान्नांचीं ताटंच्या ताटं त्यावर मांडलीं गेलीं. राणू संतुष्ट मनानं जेवूं लागला. दोन घास घेतल्यावर त्याला आठवण झाली. तो मोठ्यानं म्हणाला, " हं चल, चित्रसेना, तूंही माझ्याबरोबर जेवावयाला कां येत नाहींस ? मला एकट्यानं जेवण्याचा कंटाळा आला आहे. "

त्याबरोबर शुभ्र कपडे घातलेला एक फूटभर उंचीचा देखणा मनुष्य त्याच्यासमोर प्रकट झाला. त्याच्या चेहऱ्यावर कृतज्ञता होती. तो हात जोडून म्हणाला, " महाराज, आज गेलीं कित्येक वर्षं मी या राक्षसाला उत्तम जेवण दिलं पण त्यानं एकदांही मला जेवण्यास आमंत्रण दिलं नाहीं. तुम्ही एकदां जेवतां आहांत तर आठवणीनं तुम्ही मला बोलावलंत. मला फार बरं वाटलं. मी आजपासून तुमच्या आज्ञेंत राहीन. तुमच्या बरोबर येईन. राक्षसाची चाकरी आजपासून संपली. मला तुमचा सेवक म्हणून राहूं द्या. "

" अरे वा ! मोठ्या आनंदानं. मला तर वाटतंय, जें शोधायला म्हणून मी निघालोंय तो तूंच तर नव्हेस ? इतक्या कष्टांनीं अखेर अचानक तुझा शोध लागलाय. चल माझ्याबरोबर. आपण एकत्र प्रवास करूं, राहूं, जेवूं. तुझ्यामुळें माझ्या बऱ्याच अडचणी सुटतील. " राणू आनंदित होऊन म्हणाला.

ते दोघेही त्या किल्ल्याच्या बाहेर आले आणि दुसऱ्या वाटेनें चालूं लागले. चित्रसेन राणूबरोबरच होता पण अदृश्य स्वरूपांत. बरंच अंतर चालून गेल्यावर दूरवर त्याला रथाच्या चाकांचा आवाज ऐकूं आला. चित्रसेन म्हणाला, " हा त्या राक्षसाच्या रथाचा आवाज. आतां तो किल्ल्यांत जाईल. मूक

लागल्यावर मला हांक मारील आणि मी येत नाहीं हें बघितल्यावर चिडेल, संतापेल, पाय आपटील, शापही देईल कदाचित. ”

“ मग रे ? आपलं काय होईल ? ” राणूनं घाबरून जाऊन विचारलं.

“ कांहींसुद्धां होणार नाहीं. आपण त्याच्या अंमलाच्या बाहेर येऊन पोहोंचलों आहोंत. ” चित्रसेनानं राणूला धीर दिला.

थोड्या वेळानं ते एका झोपडीशी पोहोचले. झोपडीत एक साधू ध्यानस्थ बसला होता. राणूनें त्याला लवून नमस्कार केला. आणि त्याचं ध्यान संपल्यावर त्याला विचारलं, “ महाराज, मी एक वाटसरू आहे. दमलों आहे. आजची रात्र मला आपल्या झोपडीत वस्तीला राहूं द्याल तर मोठी मेहेरबानी होईल. ”

साधूनें त्याला नीट न्याहाळलं आणि तो म्हणाला, “ खुशाल रहा. पण मी पडलों संन्यासी. तुला निजायला गादी, पांघरायला पांघरुण असलं कांही माझ्याजवळ नाहीं. चालत असेल तर बघ.”

राणूला कांहीं नकोच होतं. त्यानं साधूचे आभार मानले. रात्र पडली. साधूनें कंदमुळं आणि कांहीं रानटी फळं आणली व तो फराळ करायला बसला. राणूलाही त्यानें पत्रावळीवर कांहीं फळें दिलीं. राणूने साधूचे आभार मानले आणि तो म्हणाला, “ आपला मान म्हणून मी एखादं फळ घेतो पण माझं जेवण मी आणलं आहे. ” असं म्हणून त्यानं चित्रसेनाला हांक मारली. “ हं, चल, चित्रसेना, माझं ताट वाढ. ”

तत्क्षणीं राणूच्या समोर गरमागरम खाद्यपदार्थांनी भरलेली सुगंधित वाफा येणारी ताटं भरून हजर झालीं.

राणू साधूला म्हणाला, “ महाराज, आपण मला आज रात्रीं

येथें राहूं देऊन माझ्यावर मोठेच उपकार केले आहेत. मला त्याची थोडीशी परतफेड करूं द्या. आपण माझ्याबरोबर जेवायला या व आपल्या पंक्तीचा लाभ मला द्या. माझ्याजवळील अन्नाची चव तर पहा. ”

साधू आश्चर्यानें थक्क झाला होता. ताजं सुग्रास अन्न पाहून त्याच्या पोटांत भूक जागी झाली. आढेवेढे न घेतां तो जेवायला बसला णाणि ते रुचकर अन्न पोटभर जेवून तृप्त झाला.

दुसऱ्या दिवशी सकाळी राणू आपल्या पुढल्या प्रवासाला निघाला. साधू त्याच्याकडे लक्षपूर्वक पहात होता. तो त्याच्या-जवळ येऊन म्हणाला, ‘ हे बघ, प्रवाश्या, तूं माझे उपकार मानलेस खरे, पण ते कोरडेच. आतां तूं तुझ्या घरीं जाशील. तुझी बायको तुला तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ करून रोज वाढील. मी इथं एकटाच आहे. कदान्न खाऊन दिवस कंठतो आहे. तूं मला तुझा चित्रसेन दे. अन्न मिळवण्याची चिंता मागे असली कीं देवाचं ध्यान करण्याकडे नीट लक्ष लागत नाहीं. चित्रसेन दिलास तर माझी अन्नाची ददात मिटेल आणि मी सुखानं देवाचं ध्यान करीन. देतोस का चित्रसेन ?

“ छे, छे भलतंच. चित्रसेनाला कसा देऊं ? ” राणू म्हणाला.

पण साधूनं हेकाच धरला. तो म्हणाला, “ मी तुला त्याहून विलक्षण अशी एक गोष्ट देतो. ” असं म्हणून त्यानं एक लहानशी हातभर लांबीची गांठी गाठींची काठी हातांत घेतली आणि तो म्हणाला, “ हं, आटप, भद्रसेना, इथं एक राजवाडा उभारून दे. ” आणि काय आश्चर्य, क्षणांत एक उंचच उंच

संपूर्ण संगमरवराचा भला मोठा राजवाडा त्यांच्यासमोर उभा राहिला. राणू डोळे विस्फारून तो पहात राहिला.

साधू राणूला म्हणाला, मोठमोठे महाल क्षणांत उभारून देणारा भद्रसेन माझा अंकित आहे. ह्या काठीला निरोप दिला कीं, तो येतो. पण मला संन्याशाला त्याचा काय उपयोग? तूं ही काठी घे आणि चित्रसेनाला बोलावणारं तें आसन मला दे. मला अन्नाची अधिक गरज आहे."

राणू विचारांत पडला. पण इतक्यांत चित्रसेन त्याच्या कानांत गुणगुणला. "राणू हा सौदा कबूल कर. त्यांत तुझा फायदाच आहे. भद्रसेन माझा मोठा भाऊ आहे. तो मला नंतर बोलावून घेईलच. तूं साधूला होकार दे. तुला जरूर वाटेल तेव्हां मी आहेच. राणू कबूल झाला. त्यानं साधूला चित्रसेनाचं आसन देऊन ती काठी घेतली आणि तो निघाला.

चालत चालत तो नदीतीरावर आला. नदीला पूर आला होता आणि तिचं पात्र खूपच विस्तीर्ण दिसत होतं. राणूला तर पलिकडे जायचं होतं. तो खूप वेळ तिथं थांबला. मग त्याला एक नावाडी होडी घेऊन येतांना दिसला. राणू नावाड्याला म्हणाला, "काय हो मला पलिकडे नेऊन पोहोचवाल का? मला लवकर पोहोचायचं आहे आणि पूर तर ओसरण्याचं कांहीं चिन्ह दिसत नाहीं. "इथं दुसरी होडीही नाहीं. तुम्हीं एवढं काम कराच."

नावाडी फार दुःखांत होता. तो म्हणाला, "या पुरानं माझी नदीकांठची झोपडी वाहून गेलीय. माझ्या पोटांत काल पासून अन्न नाहीं. मी नाहीं पोहोचवत."

राणूला आतां परत हंसाला भेटायची फार उत्सुकता लागून राहिली होती. तो नावाड्याला आग्रह करीत म्हणाला, "नावाडीबुवा, मी तुम्हाला चांगलं घर बांधून देतो. पोटभर जेवायला देतो. तुम्हीं मला पलिकडे न्याच." असें म्हणून त्यानं भद्रसेनाला आज्ञा दिली. "भद्रसेना, नावाड्याचं घर होतं तसं बांधून दे." क्षणांत नावाड्याची झोपडी पुनः पहिल्यासारखी उभी राहिली. राणूनं चित्रसेनाला हांक मारून सांगितलं, "चित्रसेना, नावाड्याला जेवायला दे." अन्नाची ताटं भरून नावाड्यासमोर हजर झाली.

नावाडी पोटभर जेवला. आपलं घर पुनः उभं राहिलेलं पाहून त्यानं राणूचे मनापासून आभार मानले व कृतज्ञतेनं तो म्हणाला, "चला, तुम्हांला पलीकडे नेऊन सोडतों." त्याचं मन राणूच्या जादूनं भारावलं होतं. तो राणूला म्हणाला, "महाराज, मी एकटा रहातों. मला दुसरं कोणी नाहीं. माझा सगळा वेळ नदीवर जातो. मला तुमची जेवणाचं ताट वाढून आणणारी जादू द्या." त्यानं राणूकडे परत आलेल्या चित्रसेनाच्या आसनाकडे बोट दाखवलं.

राणू म्हणाला, "भलतंच काय ? ती वस्तू मी देऊं शकत नाहीं." नावाडी राणूच्या हातापाया पडूं लागला. म्हणाला, "मी फुकट मागत नाहीं. माझ्याजवळ जादूची तलवार आहे. तिचा मला कांहीं उपयोग नाहीं. मला माझा वाडवडिलांपासून चालत आलेला नावाड्याचा धंदाच बरा वाटतो. ती तलवार तूं घे." असं म्हणून त्यानं एक लहानशी पोलादी तलवार काढून हवेंत फिरवली व म्हटलं, "शूरसेना, चल, धन्याच्या सेवेला

हजर हो. " तत्काळ त्यांच्यासमोर शंभर तगडे व सुसज्ज सैनि
उभे राहिले त्यांच्यापुढें त्यांचा देखणा व बलवान नायक
घोड्यावर बसलेला होता. त्या सर्वांनीं राणूला लवून मुजरा केला
नावाड्यानं हवेंत पुनः तलवार फिरवतांच ते नाहींसे झाले.

राणूने तलवार हातांत घेतली. चित्रसेन त्याच्या कानांत गुणगुणला, " कर सौदा, तलवार घेऊन माझं आसन दे. मी पुनः तुझ्याकडे येईनच. आठवण करतांच हजर राहीन. "

राणू कबूल झाला. त्यानें नावाड्याला चित्रसेनाचं आसन देऊन तलवार घेतली.

उरलेलं अंतर भराभर काटून राणू एकदांचा आपल्या घरीं परत येऊन पोहोचला तेव्हां मध्यरात्र झाली होती. त्यानं दार ठोठावलं. हंसा खडबडून उठली. राणूला पहातांच ती इतकी आनंदित झाली कीं तिला बोलायलाही सुचेना. राणू खूप दमला असेल म्हणून ती घाईघाईनें स्वैपाक करायला जाऊं लागली. पण राणूनं तिला थांबवलं. त्यानं विचारलं, " तूं बरी आहेस ना ? "

" हो. " हंसा म्हणाली.

" महाराज बरे आहेत. "

हंसानं ओठ चावला. जरा वेळानं ती म्हणाली, " महाराज आजारी नव्हतेच. तुला राज्याबाहेर घालवण्यासाठीं ते आजारी पडले होते खोटेच. तूं परत येणार नाहींस आणि मग माझ्याशीं त्यांना लग्न लावतां येईल असं वाटत होतं. आत्तां देखील तूं गेल्यापासून कितीतरीवेळां त्यांनी आपले नोकर इकडे पाठवले. तूं प्रवासातच मरण पावलास अशी खोटीच बातमी कळवली. काल तर ते स्वतः मला राजवाड्यांत बोलवायला आले होते.

मी त्यांचं ऐकलं नाहीं म्हणून खूप चिडले आणि निघून गेले. पण मला त्यांनीं उद्या सकाळपर्यंतची मुदत दिली आहे. मी त्यांच्याशी लग्न करायला तयार झालें नाहीं तर परिणाम वाईट होतील असं बजावून गेलेत ते."

राणू ऐकत होता. ऐकतां ऐकतां संतापानं मुठी वळत होता. ज्या राजावर त्याचा जिवापाड विश्वास होता. त्या राजाचा खरा स्वभाव त्याला आता कळत होता. आपण गेल्यावर एकट्या हंसाचे किती हाल झाले हे कळल्यावर तर त्याचा संतापानं भडका उडाला. त्याला हंसा पाहिजे काय ? असं स्वतःशींच म्हणून त्यानं एक निश्चय केला. साधूनं दिलेली काठी हातांत घेऊन भद्रसेनाला बोलावलं आणि सांगितलं, "आत्ताच्या आत्ता राजाच्या राजवाड्याच्या बरोबर समोरच त्याच्यापेक्षां शतपटीनं सुंदर महाल बांधून दे." महाल बांधला गेला. हंसाला घेऊन राणू त्या महालांत गेला आणि म्हणाला, "आजपासून हें आपलं घर. त्यानं नावाड्यानं दिलेली तलवार हवेत फिरवली आणि प्रकट झालेल्या शंभर सैनिकांना महालाच्या पहाऱ्यावर उभं केलं आणि मग चित्रसेनाला बोलावून जेवण मागवलं. बऱ्याच दिवसांनीं हंसा आणि राणू गप्पा मारीत पोटभर जेवलीं.

सकाळीं राजाच्या सैनिकांनी हा राजवाडा पाहिला तेव्हां त्यांनीं तोंडांत बोटं घातलीं. ही विलक्षण हकीकत त्यांनीं राजाला सांगितली. राजा स्वतःही ते दृश्य पाहून विस्मयचकित झाला. त्यानें हुकूम दिला, "या महालाच्या मालकाला बोलावून आणा."

राजाचे नोकर राणूच्या महालाकडे आले. पण पहारेकऱ्यांनीं त्यांना सांगितलं, "आम्हीं तुम्हांला किंवा तुमच्या धन्याला

ओळखत नाहीं. महालांत पाऊल टाकण्याचा प्रयत्न कराल तर नाहक मराल. " शिपाई बिचारे परत गेले. मग राजा तावा-तावानं स्वतःच बाहेर आला. तलवार घेऊन आणि रागानं लाल होऊन, या राजवाड्याकडे पहात ओरडून म्हणाला, " कोण आहे तो उर्मट माणूस ? माझ्या राजवाड्यासमोर आपला महाल उभा करणारा ? हिंमत असेल तर समोर ये म्हणावं. "

आतां मात्र राणू हातांत ती छोटी तलवार घेऊन बाहेर आला. राजाकडे पहात म्हणाला, " राजा, मला ओळखलंस ? मी राणू. हंसाचा नवरा. तुला हंसा हवी होती नाहीं कां ? असं म्हणून त्यानें तलवार हवेंत फिरवली. शंभर सैनिक उभे राहिले आणि त्यांनीं तलवारी परजल्या. त्याबरोबर प्रत्येकाच्या मागें आणखी शंभर शंभर सैनिकांची फौज उभी राहिली. एवढ्या लोकांना तिथं उभं रहायलाही जागा पुरेना. राजाचे सैनिक घाबरले, पळूं लागले. राणूच्या सैनिकांनीं राजाला पकडून राणूपुढं उभं केलं. राजा दीनवाणा झाला. राणूचं सामर्थ्य पाहून दबकून गेला. राणूचे पाय धरीत म्हणाला. " मी चुकलों, मला जीवदान दे. "

राणूनं त्याला जिवंत सोडलं पण देश सोडून जायला लावलं. त्या जुलमी राजाला कंटाळलेल्या प्रजेचा तो स्वतःच राजा झाला. राणूला राजा मानायला सारे तयार झाले. आणि मग खूप वर्षां-पर्यंत राणू आणि हंसानं सुखानं राज्य केलं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. बालवाचनालय शाखा.
अनुक्रमांक ... स ग्रास ... बालवाङ्मय
क्रमांक ... नोंद दि. 30/3/69